



परळी
# संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

या जागेवर
जाहिरात घेणे आहे
त्वरित संपर्क
9881265102

बीड वर्षे- 10 वे | अंक क्र 302 मंगळवार दि. 09 डिसेंबर 2025 पृष्ठे 4 किंमत 2 ₹ RNI: MAHMAR/2016/67060

## श्रमिक-कष्टकऱ्यांसह वंचित घटकांसाठी अखेरपर्यंत झुंजणारा महान संघर्षयोध्दा हरपला, बाबा आढावांचं निधन



पुणे : ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि कष्टकऱ्यांचे नेते डॉ. बाबा आढाव (वय 95) यांचे सोमवारी रात्री निधन झाले. हमाल, रिक्षाचालक आणि बांधकाम मजुरांचे संघटन करून त्यांच्या न्यायासाठी लढणारे श्रमिक चळवळीचे आधारस्तंभ ही त्यांची ओळख होती. त्यांच्यामागे पत्नी शीला आढाव, असीम आणि अंबर हे दोन मुलगे, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.

फुफ्फुसात बिघाड झाल्याने डॉ. बाबा आढाव यांच्यावर गेल्या दहा दिवसांपासून खासगी रुग्णालयात उपचार सुरु होते. श्वास घेण्यास त्रास होत असल्याने त्यांना कृत्रिम श्वसन यंत्रणेवर ठेवण्यात आले होते. मात्र, वयोमानामुळे त्यांची प्रकृती उपचारांना पुरेसा प्रतिसाद देत नव्हती. उपचारांदरम्यान सोमवारी रात्री साडेआठच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली.बाबा आढाव यांचा जन्म 1 जून 1930 रोजी पुण्यात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण महापालिका शाळेत तर, शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण झाले. रसायनशास्त्राची पदवी संपादन करून त्यांनी ताराचंद रामनाथ आयुर्वेद महाविद्यालयातून 1952 मध्ये पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी नाना पेठेतील घरी वैद्यकीय व्यवसाय सुरु केला. भाऊसाहेब रानडे, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, आणि राम मनोहर लोहिया यांच्या समाजवादी सिद्धांतांनी बाबा प्रेरित झाले. राष्ट्र सेवा दलात भाई वैद्य, पन्नालाल सुराणा, बापूसाहेब काळदाते यांच्यासह इतर समाजवादी नेत्यांसोबत त्यांनी काम केले.परिचारिका म्हणून काम करणाऱ्या शीला गरुड यांच्याशी 1966 मध्ये बाबा विवाहबद्ध झाले. राज्यातील दुष्काळादरम्यान हमालांच्या हलाखीच्या परिस्थितीने व्यथित झालेल्या बाबांनी महागाई आणि अन्नधान्याच्या रेशनिंगविरुद्ध सत्याग्रह केला. त्यांनी तीन आठवडे तुरुंगवास भोगला आणि सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी वैद्यकीय व्यवसाय बंद करण्याचा निर्णय घेतला. हमालांना संघटित करण्याच्या प्रयत्नांतून हमाल पंचायत ही असंघटित कामगारांची पहिली संघटना त्यांनी स्थापना केली. पान 3 वर

## “आजच्या सामाजिक दृष्ट्या अस्थिर, विषमतेने, विद्वेषाने ग्रासलेल्या काळात..”

### बाबा आढाव यांच्या निधनानंतर शरद पवारांची प्रतिक्रिया;





ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि कष्टकऱ्यांचे नेते डॉ. बाबा आढाव (वय 95) यांचे सोमवारी रात्री निधन झाले. हमाल, रिक्षाचालक आणि बांधकाम मजुरांचे संघटन करून त्यांच्या न्यायासाठी लढणारे श्रमिक चळवळीचे आधारस्तंभ ही त्यांची ओळख होती. त्यांच्यामागे पत्नी शीला आढाव, असीम आणि अंबर हे दोन मुलगे, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.फुफ्फुसात बिघाड झाल्याने डॉ. बाबा आढाव यांच्यावर गेल्या दहा दिवसांपासून खासगी रुग्णालयात उपचार सुरु होते. श्वास घेण्यास त्रास होत असल्याने त्यांना कृत्रिम श्वसन यंत्रणेवर ठेवण्यात आले होते. मात्र, वयोमानामुळे त्यांची प्रकृती उपचारांना पुरेसा प्रतिसाद देत नव्हती. उपचारांदरम्यान सोमवारी रात्री साडेआठच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. कामगार चळवळीचा बुलंद आवाज या पान 3 वर

## पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांची दीपक देशमुख यांनी घेतली भेट

### फोन रेकॉर्डिंगची गंभीर दखल घेऊन सौ.संध्या दीपक देशमुख व दीपक देशमुख यांना तत्काळ संरक्षणाची मागणी



**अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही**

परळी शहरात मतदान 20 डिसेंबर रोजी होणार असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे अत्यंत आवश्यक आहे

बीड/ परळी वैजनाथ (प्रतिनिधी) –परळी वैजनाथ नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 च्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) यांच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. संध्या दीपक देशमुख व त्यांचे पती माजी नगरसेवक दीपक रंगनाथ देशमुख यांच्या जीवितास व सुरक्षिततेस धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून, त्यांना तत्काळ पोलीस संरक्षण देण्याची मागणी करण्यात आली आहे.

या संदर्भात माजी नगराध्यक्ष दीपक रंगनाथ देशमुख यांनी बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कवत यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. यापूर्वी खासदार बजरंग सोनवणे पान 3 वर




## आज ठळक

### धनंजय मुंडे, अजित पवारांनी घेतली मुख्यमंत्री फडणवीसांची भेट



नागपूर हिवाळी अधिवेशनाचे पहिल्याद दिवसाचे कामकाज स्थगित झाल्यानंतर मोठी बातमी समोर आली आहे. माजी मंत्री, आमदार धनंजय मुंडे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. या भेटीवेळी पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला या देखील उपस्थित होत्या. त्यामुळे ही भेट नेमकी कशासाठी होती? याच्या चर्चा सुरु झाल्या आहेत.संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर धनंजय मुंडे यांनी प्रकृतीचे कारण देत मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. विरोधी पक्षाकडून मुंडे यांना सातत्याने टार्गेट केले जात होते. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी देखील मुंडेंनी आपल्याला मारण्यासाठी अडीच कोटी तिघांना दिले होते, असे आरोप केले होते. मुंडेंना क्लिन चिट मिळावी म्हणून ते अजित पवारांकडे विनंती करत असल्याचेही जरांगे म्हणाले.दरम्यान, धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री यांच्यासोबत झालेल्या भेटीविषयी सांगताना ही भेट आपल्या मतदारसंघातील विकास कामांच्यासंदर्भात होती पान 3 वर

## ना पक्षाची साथ... ना जिल्हा पदाधिकाऱ्यांचे सहकार्य...

### कॉंग्रेसचे शहराध्यक्ष बहादूरभाई यांची आजारातही एकाकी झुंज, नागरिकांतुन होतेय कौतुक



परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

‘किडनीच्या आजाराने त्रस्त... हाताला सलाईन लावलेली..., पक्षाची अपेक्षित साथ आणि जिल्हा पदाधिकाऱ्यांचेही सहकार्य नाही...’ अशा चोहीकडून घेरल्या गेलेल्या परिस्थितीतही न डगमगता एकहाती प्रचाराची धुरा सांभाळून नगर परिषद निवडणूक लढवणारे कॉंग्रेसचे शहराध्यक्ष बहादूरभाई हे सध्या कौतुक आणि चर्चेचा ठरले आहेत. मनुष्यबळ कमी असताना आणि आर्थिक बाजू मजबूत नसतानाही बहादुरभाई यांनी दोन्ही ताकदीशी दिलेली एकाकी झुंज हा लोकांमध्ये चर्चेचा विषय ठरली आहे.

परळी वैजनाथ नगर पालिकेची निवडणूक नुकतीच संपन्न झाली आहे. यात नगराध्यक्ष पदासाठी तिरंगी लढत झाली. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शरद पवार आणि अजित पवार असे दोन्ही गटाचे प्रबळ उमेदवार उभे असताना कॉंग्रेसच्या वतीने शहराध्यक्ष बहादूरभाई यांनी तगडी फाईट दिली. बहादुरभाई यांनी सुरुवातीपासूनच महाविकास आघाडीला ‘ही जागा कॉंग्रेसला लढू द्यावी’ असा आग्रह धरला होता. मात्र राष्ट्रवादी शरद पवार गटाने शह देत नगराध्यक्ष पदासाठी माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांच्या पत्नी सौ. संध्याताई देशमुख यांना उमेदवारी दिली. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे प्रामाणिक काम करणाऱ्या बहादूरभाई यांनी नगर पालिकेमध्ये मात्र वंचित बहुजन आघाडीच्या सहकार्याने कॉंग्रेसचा स्वतंत्र उमेदवार मैदानात उतरविला. सुरुवातीला पक्षश्रेष्ठींनी ‘तुम्हाला लागेल ती मदत देऊ’ असा शब्द बहादूरभाई यांना दिला. त्यामुळे बहादुरभाई यांनी जोरदार तयारी केली. वंचित बहुजन आघाडीला सोबत घेत त्यांनी नगराध्यक्ष पदासह सुमारे 30 जागी कॉंग्रेस आणि वंचित आघाडीचे उमेदवार उभे केले.



### पक्षश्रेष्ठींनी घेतले अंग काढून

पक्षश्रेष्ठींनी शब्द दिल्यामुळे बहादुर भाई यांनी नगराध्यक्ष पदासाठी मैमुना बेगम सय्यद हनीफ ऊर्फ बहादूरभाई यांना उभे करून सर्वच प्रभागात उमेदवार दिले. बहादूरभाई यांचा शहरात असलेला दांडगा संपर्क आणि त्यांनी राबवलेली प्रभावी प्रचार यंत्रणा यामुळे दुरंगी वाटणारी लढत तिरंगी झाली. निवडणूक ऐन रंगात आली असतानाच कॉंग्रेसच्या श्रेष्ठींनी अचानक आहात वर केले. पक्षाकडून म्हणावे तसे सहकार्य मिळाले नाही. एकही मोठा नेता प्रचाराला आला नाही किंवा पक्षाने कोणतेही आर्थिक सहकार्य केले नाही.

असे असले तरी बहादूर भाई हे “लगान टीम” घेऊन मैदान गाजवत होते. त्यांनी राबवलेली प्रचार यंत्रणा अतिशय प्रभावी ठरवू लागली. ‘एकखांबी तंबू’ ठोकून मैदान मारत असतानाच पक्षाप्रमाणेच त्यांना तब्येतीनेही धोका दिला. निवडणूक ऐन ‘बहरात’ असतानाच त्यांना गंभीर आजाराने घेरले. अगोदरच साथीला कमी मनुष्यबळ आणि त्यात आजार यामुळे बहादुरभाई कमालीचे एकाकी पडले, पण त्यांनी मैदान सोडले नाही आणि कुठे काही कमीही पडू दिले नाही. या लढाईत समाजाने मात्र त्यांना पूर्ण सहकार्य केल्याचे दिसून येते.

### ➡ बहादूरभाई यांना विजयाची खात्री

पक्षाने पालिका निवडणुकीत कसलेही सहकार्य केले नाही. प्रचार साहित्य दिले नाही, सभा दिल्या नाहीत किंवा साधा रुमालसुद्धा दिला नाही. तरीही ते पुढे जात राहिले. आजारी असतानाही शहराच्या विविध भागात तब्बल 12 “कॉर्नर सभा” घेऊन कॉंग्रेस- वंचित बहुजन आघाडीला विजयी करण्याचे आवाहन केले. पक्षाचे बरेच नेते विरोधकांना जाऊन मिळाले. काही उघडपणे तर काहींनी विरोधकांना छुपे सहकार्य करून बहादूरभाई यांना एकटे पडण्याचा प्रयत्न केला. असे असले बहादूर भाई यांना समाजाने आणि “लगान टीम” पूर्ण सहकार्य केल्यामुळे त्यांना विजयाची खात्री आहे.

### हाताला सलाईन अन् कानाला मोबाईल

नगर पालिका निवडणूक वातावरण तापलेले असतानाच बहादूरभाईंना किडनीचा गंभीर आजार निदान झाला. डॉक्टरांनी सक्तीच्या विश्रांतीचा सल्ला दिला. असे असले तरी बहादुरभाई यांनी एका हाताला सलाईन लावून कानाला मोबाईल ठेवत कार्यकर्ते - मतदारांशी संवाद कायम ठेवला. फोनवरुनच प्रचाराची सर्व यंत्रणा कार्यान्वित ठेवली. कुठेही काहीही कमी पडणार नाही याची खबरदारी घेतली.

राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट हे पूर्ण ताकदीने मैदानात उतरले होते. त्यांच्या दिमतीला नेते आणि कार्यकर्त्यांची मोठी फौज मैदानात होती. असे असतानाही बहादुरभाई यांनी मात्र ‘लगान टीम’ सोबत घेऊन निवडणूक जोरदारपणे लढवली. त्यांची एकाकी झुंज ही राजकीय क्षेत्रात आणि नागरिकांमध्ये कौतुक आणि चर्चेचा विषय ठरली.

## परळीचा ओंकार ठरला बीड जिल्ह्यात सर्वाधिक ऊस दर देणारा साखर कारखाना

### पुर्ण भाव ३०५० रुपये प्रति टन व पहिला हप्ता २९५० रुपये



**चेअरमन बाबुरावजी बोत्रे पाटीलांचे शेतकऱ्यांतून अभिनंदन**

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) : परवडणा-या ऊस दरासाठी बीड जिल्ह्यात मोठे अंदोलन झाले , अडीच हजारापर्यंत भाव देणाऱ्या बीड जिल्ह्यातील साखर कारखानदारांनी अंदोलनाच्या रेट्या मुळे अठ्ठावीससे पर्यंत भाव नेला, सगळे कारखानदार एवढ्याच दहापर्यंत राहतील असे वाटत असतांना परळीतील पांगरी च्या ओंकार साखर कारखान्याचे चेअरमन बाबुरावजी बोत्रे पाटील यांनी 3050 एवढा भाव घोषीत केला आहे. कारखान्याचे मॅनेजर वैभव व्ही .काशीद यांनी जाहिर पत्रक काढले आहे. या पत्रकात म्हटले आहे कि, मा. चेअरमन बाबुरावजी बोत्रे पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली ओंकार साखर कारखाना प्रा. लि. युनिट क्र. 8 पांगरी ता. पान 3 वर



## श्री.संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती तालुक्यातील विविध कार्यालयात साजरी



परळी वैजनाथ दि.08 (प्रतिनिधी) श्री. संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती शहर व तालुक्यात विविध शासकीय निमशासकीय कार्यालयात सोमवारी (ता.08) उत्साहात साजरी करण्यात आली.

श्री.संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती शहरातील विविध शासकीय, निमशासकीय कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. येथील शनिमंदिरात महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा,शनी मंदिर देवस्थान ट्रस्ट, तेली युवक संघटना व शनैश्वर प्रतिष्ठानच्या वतीने श्री.संत संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री. संत संताजी जगनाडे पान 3 वर

# मत द्यावे तरी कुणाला?

लोकशाही मध्ये मतदानाचा हक्क हा पवित्र हक्क मानला जातो व हा हक्क प्रत्येक सुजाण नागरिकाने बजावावा अशी अपेक्षा असते. हे जरी खरे असले तरी आपल्या सारख्या सामान्य जनाला नेहमीच सतावणारा प्रश्न म्हणजे ‘ मत द्यावे तरी कुणाला ?

‘हॅम्लेटच्या ‘To be or not to be’ प्रत्रा इतकाच जटिल प्रश्न आहे. वास्तविक कोणत्याही राजकीय पक्षाचे अंतिम ध्येय जनतेचे कल्याण हेच असते आणि असे असले तरी प्रत्येक राजकीय पक्षाची एक विशिष्ट विचारसरणी असते. तसेच प्रत्येक नागरिक देखील कोणत्यातरी विचारसरणीचा असतो. लोकशाहीमध्ये आपणाला कोणता तरी गट निवडावा लागतो आपल्याला केवळ गट निवडण्याचे स्वातंत्र्य असते. बरे एकदा कां हे मान्य केले की, कोणत्यातरी पक्षाला मत देणे ओघानेच येते परंतु नेमका गोंधळ असा होतो की, त्यापक्षाने दिलेला उमेदवार अगदीच कुचकामी असतो मग अशा वेळी मतदार म्हणून आपला गोंधळ होतो. तर काहीवेळा उमेदवार विद्वान असतो,

परंतु जनसामान्या च्या अडचणी तो दूर करेल अशी शक्यता नसते तर याऊलट एखादा उमेदवार गुन्हेगार पार्श्वभूमी असलेला असतो परंतु वरकरणी तरी तो इतरांच्या मदतीला धावून जाताना दिसतो.

अशावेळी मतदार म्हणून आपण करावे तरी काय असा गुंता होत राहतो.

व्यक्ती म्हणून विचार न करता पक्षाच्या विचारसरणीला महत्व देवून मतदान करावे तर तो पक्ष आपल्या विचारसरणीत कधी बदल करील याची शाश्वती नसते. तसेच कोणताही पक्ष आपल्या प्रतिनिधीला आपल्या वैचारिक स्वातंत्र्याचा उपयोग करून देत नसतो. उमेदवार पाहून मत दिले तर तो कोणत्या पक्षात प्रवेश करील

याची शाश्वती राहिलेली नाही. त्यामुळे मूळ प्रश्न अनुत्तरित राहतो. बरे आपण कोणत्याच पक्षाच्या विचारसरणीला बांधील रहायचे नाही असे ठरविले तरी अडचण होते वास्तविक लोकशाहीमध्ये आपणास कोणत्यातरी समूहात सामील व्हावेच लागते आपणास केवळ समूह निवडण्याचे स्वातंत्र्य असते. या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी मी माझ्या मित्राकडे गेलो व त्याला हा प्रश्न विचारला. मला वाटले : त्यालाही माझ्यासारखाच प्रश्न पडला असेल त्यामुळे तोही बुचकळ्यात पडेल. परंतु तसे झाले नाही. त्याने तो प्रश्न लीलया सोडविला. त्याने सांगितले, अरे, एवढा कशाला विचार करायचा तू कुणालाही मत दे कारण आज आपल्याला सज्जन व विद्वान वाटणारा उमेदवार उद्या तसा राहील याची खात्री नाही तर आपण आपल्याला नआवडणाऱ्या विचारसरणीच्या पक्षाच्या उमेदवाराला मत दिले तरी तो उद्या आपल्याला सोयीच्या विचारसरणी च्या पक्षात प्रवेश करणार नाही असेही नाही. त्यामुळे कोणालाही मत दिले तरी शेवटी लोकशाही टिकविण्याचे पुण्य मिळणारच आहे त्यामुळे मत कुणालाही द्यावे.

**डॉ.डी.एल.चव्हाण**
**म.गां.महाविद्यालय,**
**अहमदपूर.**

# 1 लाख 4 हजार कोटी रुपये बेवारस! तुमचे पैसे त्यात तर नाहीत ना?

**➡ डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी**

भारताची आर्थिक वाटचाल वेगवान असली, तरी त्या प्रवासाच्या सावलीत एक गंभीर वास्तव लपलेले आहे—देशातील बँका, विमा कंपन्या, म्युच्युअल फंड आणि कंपन्यांच्या डिव्हिडंड खात्यांमध्ये हजारो कोटी रुपये वर्षानुवर्षे “बेवारस” अवस्थेत पडून राहतात. हा पैसा कुणाचा तरीच असतो, मात्र योग्य माहिती, कागदपत्रांची सुसूत्रता आणि वारसांपर्यंत पोहोचणारी व्यवस्था नसल्यामुळे तो आर्थिक प्रणालीत गोठून जातो. ही स्थिती आर्थिक अपयशापेक्षा अधिक आर्थिक अज्ञानाचे लक्षण आहे.



पंतप्रधानांनी अलीकडे दिलेल्या माहितीनुसार देशातील बँकांमध्ये सुमारे 78 हजार कोटी रुपये दावा न झालेल्या स्वरूपात आहेत. आयुर्विमा कंपन्यांकडे 14 हजार कोटी रुपये, म्युच्युअल फंडांमध्ये जवळपास 3 हजार कोटी रुपये, तर कंपन्यांच्या न वाटप झालेल्या डिव्हिडंड स्वरूपात सुमारे 9 हजार कोटी रुपये अडकलेले आहेत. म्हणजेच एकत्रित विचार करता ही रक्कम एक लाख कोटी रुपयांच्या वर जाते. हे आकडे धक्कादायक आहेत, कारण हा पैसा सरकारचा नाही, तर सामान्य नागरिकांचा आहे—ज्यांनी कष्टाने कमावलेले, बचतीतून जमा केलेले आणि भविष्यासाठी बाजूला ठेवलेले पाठीवरचे ओझे आहे.

या संपत्तीमागे गरीब, मध्यमवर्गीय, शेतकरी, नोकरदार, व्यापारी, स्वयंरोजगार करणारे लाखो नागरिक आहेत. अनेकदा एखाद्या व्यक्तीने दोन-तीन बँकांमध्ये खाती उघडलेली असतात, कुठे तरी FD केलेली असते, कुणीतरी विमा एजंटच्या आग्रहाखातर पॉलिसी घेतलेली असते, मुलांच्या शिक्षणासाठी म्युच्युअल फंड सुरु केलेला असतो, किंवा कंपनीतील सेवेतून PF आणि NPS जमा होत असतो. या प्रत्येक व्यवहाराचा सुगावा कुटुंबाला नसेल, तर मृत्यूनंतर ती सर्व गुंतवणूक कागदांपुरती उरते आणि हळूहळू ‘बेवारस’ ठरते.

सरकारने या अडकलेल्या पैशांचा मालक शोधण्यासाठी विशेष शिबिरे, बँकस्तरीय मोहिमा आणि तपास प्रक्रिया सुरु केल्या आहेत. आतापर्यंत शेकडो जिल्ह्यांतून हजारो कोटी रुपये त्यांच्या मूळ वारसदारांकडे परत गेले आहेत. याचा अर्थ असा की योग्य माहिती, ओळख आणि कागदपत्रे असतील तर विसरलेला पैसा सुद्धा पुन्हा हातात येऊ शकतो. मात्र या प्रक्रियेत वेळ, संयम आणि पुरावे लागतात—जे आधीच नीट व्यवस्थीत केले असते, तर ही धावपळच उरली नसती.

येथूनच खऱ्या आर्थिक साक्षरतेची गरज पुढे येते. आर्थिक साक्षरता म्हणजे फक्त कमावणे किंवा खर्च करणे नव्हे, तर आपल्या संपूर्ण आर्थिक जीवनाचा नकाशा स्वतःच्या ताब्यात असणे होय. प्रत्येक व्यक्तीकडे किती खाती आहेत, कुठे गुंतवणूक आहे, कोणती देणी आहेत, कोणत्या योजनेत किती रक्कम अडकलेली आहे—हे स्पष्टपणे समजून घेणे ही आर्थिक शिस्त आहे. दुर्दैवाने बहुतेकांना त्यांच्या स्वतःच्या गुंतवणुकीचा संपूर्ण आरसाच माहीत नसतो.

यातील पहिला टप्पा म्हणजे स्वतःची आर्थिक यादी तयार करणे. बँक खाती, मुदत ठेवी, विमा पॉलिसी, म्युच्युअल फंड, शेअर्स, PF, NPS, पोस्ट ऑफिस योजना, कर्जे, तसेच डिजिटल वॉलेट्स—या सर्वांचा तपशील एका ठिकाणी नोंदवणे आवश्यक असते. ही नोंद कागदावर, फाईलमध्ये किंवा पासवर्डने सुरक्षित केलेल्या डिजिटल स्वरूपात ठेवली पाहिजे. तितकेच महत्त्वाचे म्हणजे ही माहिती घरातील किमान एका विश्वासू व्यक्तीला माहीत असली पाहिजे.

दुसरा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे योग्य नॉमिनेशन. अनेकदा लोक पहिल्यांदा खाते उघडताना नॉमिनी भरतात, पण पुढील आयुष्यात झालेले बदल—लग्न, मुलांचा जन्म, पालकांचे निधन, घटस्फोट—यांनुसार नॉमिनी अद्ययावत करत नाहीत. जुना नॉमिनी मृत असल्यास किंवा संपर्कात नसल्यास वारसांना पैसे मिळवताना मोठ्या कायदेशीर अडचणी येतात. नॉमिनेशन चुकीचे असल्यामुळे पैसा मिळतो, पण वाद वाढतात—अशा अनेक घटना समाजात दिसतात.

तिसरा मुद्दा म्हणजे वसीयत (Will). भारतात आजही वसीयतेबाबत गैरसमज, भीती आणि टाळाटाळ आहे. प्रत्यक्षात वसीयत म्हणजे मृत्यूची चर्चा नव्हे, तर जबाबदारीचे नियोजन आहे. घर, जमीन, बँक ठेवी, गुंतवणूक, व्यवसायातील हिस्से—या सर्वांचा वाटप कोणाला कसा व्हावा, हे स्पष्ट शब्दांत नमूद केले तर वारसांमध्ये गैरसमज, संघर्ष आणि कोर्टकचेऱ्या टाळता येतात. थोड्याशा खर्चात आणि साध्या कायदेशीर प्रक्रियेत वसीयत करता येते, पण तिचा फायदा पिढ्यान्पिढ्यांना होतो.

आज आर्थिक व्यवस्थेत आणखी एक नवी डोकेदुखी निर्माण झाली आहे—डिजिटल पैसा. UPI, मोबाइल वॉलेट, ऑनलाइन ट्रेडिंग, डिजिटल बँकिंग यामध्ये मोठी रक्कम अडकलेली असते. मात्र मोबाइलचा PIN, ई-मेलचा पासवर्ड, ॲप्सचे लॉग-इन तपशील कुणालाच माहीत नसल्यामुळे मृत्यूनंतर ही रक्कम प्रत्यक्षात काढणे अशक्य होते. त्यामुळे डिजिटल खात्यांची माहितीही सुरक्षित स्वरूपात नोंदवणे ही आजच्या काळातील अनिवार्य बाब बनली आहे.

या पार्श्वभूमीवर फसवणुकीचे प्रकारही वाढले आहेत. “तुमचा दावा न झालेला पैसा मिळवून देतो”, “हा सरकारी लिंक आहे”, “OTP द्या” अशा कॉल्स आणि संदेशांमधून नागरिकांची फसवणूक होते. सरकारी यंत्रणा कधीही फोनवरून OTP, PIN, आधार क्रमांक किंवा बँक तपशील मागत नाही—ही मूलभूत सावधगिरी प्रत्येकाने लक्षात ठेवली पाहिजे.

आर्थिक साक्षरतेचा आणखी एक पैलू म्हणजे वारसा नियोजनाबाबत कुटुंबात मोकळा संवाद. पैशांबाबत बोलणे टाळण्याची सवय अनेक घरांत आहे. “मी असतानाच का हा विषय?” अशी मानसिकता असते. पण प्रत्यक्षात आर्थिक पारदर्शकता ही कुटुंबाच्या सुरक्षिततेची पूर्वअट आहे. वेळेत संवाद झाला, तर भविष्यातील संभ्रम थांबतो.

आज देशात मोठ्या प्रमाणावर आर्थिक योजना, विमा संरक्षण, निवृत्तीवेतन, गुंतवणूक आणि बचतीची साधने उपलब्ध आहेत. मात्र या सर्व सुविधांचा खरा फायदा माहितीशिवाय होत नाही. माहिती नसलेली आर्थिक संपत्ती ही प्रत्यक्षात असुरक्षित संपत्तीच ठरते. म्हणूनच पंतप्रधानांनी दिलेली आकडेवारी ही केवळ आर्थिक अहवाल नाही, तर समाजाला दिलेला इशाराच आहे—आपल्या पैशाची जबाबदारी आपणच घ्यावी लागेल.

आज प्रत्येक नागरिकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे. मी कुठे पैसे ठेवले आहेत, हे मला माहीत आहे; पण माझ्या अनुपस्थितीत ते माझ्या कुटुंबाला माहीत असतील का? माझ्या कष्टाची कमाई सुरक्षित मार्गाने माझ्या मुला–बाळांपर्यंत पोहोचेल याची मी व्यवस्था करून ठेवली आहे का? या प्रश्नांची उत्तरं “हो” अशी ठामपणे देता येतील, तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने आर्थिकदृष्ट्या सुज्ञाण ठरू.

कारण पैसे असणे ही समृद्धी नाही, तर पैसे योग्य ठिकाणी, योग्य माणसाकडे आणि योग्य वेळी पोहोचणे हीच खरी आर्थिक सुरक्षितता आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# कानपूर. जिल्ह्यातील मुली कथित प्रेमींसाठी त्यांच्या पालकांना सोडून देण्यात आघाडीवर

## , अनेक मुलींचे प्रेमी लग्न न करता त्यांना आई बनवून फरार

**सुनील बाजपेयीः**

कानपूर. जिल्ह्यातील मुली कथित प्रेमींसाठी त्यांच्या पालकांना सोडून देण्यात आघाडीवर आहेत. - - आणि त्याहूनही उल्लेखनीय म्हणजे दरमहा शहरातून पळून जाणाऱ्या सुमारे एक डझन मुलींपैकी बहुतेक मुली त्यांच्या कथित प्रेमींशी लग्न करून गर्भवती झाल्यानंतरच परत येतात.

यापैकी, पळून जाणाऱ्या मुलींची संख्या नौबस्ता, बारा, गोविंद नगर, कल्याणपूर, सचेंडी, चकेरी, घाटमपूर, बिधानू, बिल्हौर महाराजपूर आणि पंकी पोलिस स्टेशन परिसरातून सर्वाधिक आहे.

इतकेच नाही तर अनेक मुलींनी त्यांचे खरे पालक, ज्यांनी त्यांना वाढवले, त्यांना कायमचे सोडून दिले आहे आणि त्यांच्या कथित प्रियकरांच्या बाजूने त्यांच्या पालकांविरुद्ध निवेदने देण्यासही मागेपुढे पाहिले नाही.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीवर विश्वास ठेवायचा झाला तर, अनेक मुलींचे प्रेमी लग्न न करता त्यांना आई बनवून फरार झाले आहेत. शिवाय, अशा अनेक मुली आहेत ज्या त्यांच्या प्रियकरांसोबत पळून गेल्यानंतर, त्यांच्या स्थितीबद्दल आणि त्यांच्या ठिकाणाबद्दल - त्या जिवंत आहेत की नाही याबद्दल अद्याप कोणतीही माहिती मिळालेली नाही.

एवढेच नाही तर, विविध पोलिस ठाण्यांमधील पोलिसांनाही मुली पळून जाण्याच्या घटनांमुळे खूप त्रास होतो. एका मुलीला परत मिळवता येईपर्यंत, दुसरी तिच्या प्रियकरासह पळून गेलेली असते.



एवढेच नाही तर अनेकदा अशा परिस्थिती उद्भवतात की पोलिसांना पोलिस ठाण्यांमध्ये आणि चौक्यांमध्ये लग्न लावण्यास भाग पाडले जाते. अनेक प्रकरणांमध्ये, बिल्हार पोलिस ठाण्याअंतर्गत येणारा आरोल चौकी परिसर खूप चर्चेत आला आहे. वारंवार विनंती करूनही, तरुणीने तिच्या जैविक पालकांना नकार दिला आणि पोलिस ठाण्यात तिच्या प्रियकराशी लग्न केले, तिच्या पालकांना भेटल्याशिवायही निघून गेली.

घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, परिसरातील गुजेपूर गावातील रहिवासी चंद्रभान यांची 19 वर्षीय मुलगी नेहा हिचे कन्नौजच्या बरौली गावातील नातेवाईक सेतराम यांचा मुलगा योगेंद्र याच्याशी प्रेमसंबंध होते. काही दिवसांपूर्वी ती तिच्या कुटुंबाला न सांगता निघून गेली. मुलीच्या कुटुंबाने पोलिसात तक्रार दाखल केली. मोबाईल फोनद्वारे पोलिसांशी संपर्क साधल्यानंतर हे जोडपे आरोल पोलिस ठाण्यात पोहोचले.

येथे, प्रौढ असल्याचा दावा करणारी नेहाने लग्न करण्याची तयारी दर्शविली. यामुळे व्यथित होऊन तिच्या पालकांनी तिला समजावण्याचा प्रयत्न केला, परंतु तिने तिच्या पालकांना सोडण्यास सहमती दर्शविली परंतु तिच्या प्रियकराला सोडण्यास नकार दिला. या सक्तीमुळे, त्यांना पोलिस ठाण्यातच तिच्या प्रियकराशी त्यांच्या मुलीचे लग्न लावण्यास भाग पाडले गेले.

त्याचप्रमाणे, शहरातील असंख्य इतर मुलींनी त्यांच्या कथित प्रियकरांसाठी त्यांच्या जैविक पालकांना सोडून दिले आहे. आणि हा ट्रेंड थांबलेला नाही, तर तो अजूनही सुरु आहे. कानपूरमध्ये मुली पळून जाण्याची परिस्थिती अशी आहे की पोलिसांना एका मुलीला परत मिळवता येण्यापूर्वीच दुसरी मुलगी तिच्या कथित प्रियकरासोबत पळून जाते. म्हणजेच, हा ट्रेंड येथे अखंडपणे सुरु आहे.

# सिरसाळा ग्रामपंचायत कार्यालयात जयंती साजरी...



तालुक्यातील सिरसाळा ग्रामपंचायत कार्यालयात श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्यांसह तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठवाड्यातील मृदेचे वर्तमान आरोग्य : एक धोक्याचा इशारा?

**भविष्य मराठवाड्यातील शेतीचे..! प्रा. अक्षय काकडे, प्रा. प्रविण मांजरे, डॉ.एम.बी.पाटील, प्रा.शैलेश रुद्राक्ष (कृषि सल्लागार, ग्लोबल विकास ट्रस्ट, कृषिकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्र सिरसाळा, ता. परळी जि . बीड)**

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर, धाराशिव या जिल्ह्यांचा समावेश असलेला, गोदावरी नदीच्या खोऱ्यात वसलेला प्रदेश म्हणजे मराठवाडा विभाग. शिक्षणाने आणि सांस्कृतिक वारशाने नावाजलेले छत्रपती संभाजीनगर, नांदेड, लातूर, आंबेजोगाई हे परिसर जितके परिचित वाटतात तितकेच दुष्काळ ग्रस्त मराठवाड्याचे चित्रही आपल्या डोळ्यासमोर लगेच उभे राहते. सततचा पडणारा कोरडा दुष्काळ व नुकताच अनुभवलेला ओला दुष्काळ या सोबतच कोरडवाहू प्रदेश म्हणून ओळख असलेला मराठवाडा अनेक आसमानी संकटाना नेहमी समोर जाताना आपण पाहत आलो आहोत.

आता याच मराठवाड्यात अजून एक धोक्याचा इशारा समोर येताना दिसतो आहे - ते म्हणजे येथील मृदेचे खालावत जाणारे आरोग्य. माती जिला आपण धरणी माता म्हणतो, शेतीचा पाया मानतो, अब्जावधी लोकांना अन्न पुरवणारी हीच माती आज स्वतः भुकेली आहे. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या अनेक जीवाणु मातीवर अवलंबून आहेत परंतु शेतकरी हा प्रत्यक्षरित्या मातीवरच अवलंबून आहे. वाढता उत्पादन खर्च व खालावत चाललेली मातीची उत्पादकता, हाच तो एक धोक्याचा इशारा. एकेकाळी भारत देश जेंव्हा सुजलाम सुफलाम होता आणि आपण त्याला सोने की चिडिया असे संबोधत होतो, त्याबरोबरच काही दशका पूर्वीचा कार्यकाळ सुद्धा बघितला असता जमिनीचे आरोग्य खूप चांगले होते. आज मातीच्या सुपीकतेचा कणा व मातीचा आत्मा म्हणून संबोधत असलेला जमिनीतील सेंद्रिय कर्बची पातळी सरासरी आज कुठे तरी 0. 50 ते 0.30% पेक्षाही कमी येऊन पोहोचली आहे. जमिनीचा हा कणा/आत्मा क्षीण होत चालला आहे. हा मराठवाड्यातील मृदेच्या आरोग्याचा गंभीर इशारा आहे. मराठवाड्यातील मृदेचे वर्तमान आरोग्य आपण या लेखात पाहणार आहोत.

मराठवाड्यातील बहुतांश भाग हा डेक्कन ट्रॅप म्हणजे ज्वालामुखीजन्य बेसॉल्ट खडकांपासून निर्मित काळ्या मातीने व्यापलेला आहे. ही माती कापुस लागवडीसाठी प्रसिद्ध आहे. ही काळी माती गोदावरी, मांजरा, पूर्णा, दुधना आणि पैनगंगा या नद्यांच्या खोऱ्यात आणि त्यांच्या उपनद्यांच्या किनारी आढळते. ह्या मातीत पाणी व ओलावा धरुन ठेवण्याची क्षमता जास्त आहे. या प्रदेशाचा बहुतांश भाग हा मध्यम काळ्या मातीने व्यापलेला असून ही माती वनस्पतींसाठी लागणाऱ्या पोषक तत्त्वांनी समृद्ध आहे. ज्वारी, बाजरी, गहू, डाळी, कापूस आणि ऊस यांसारख्या खरीप व रब्बी हंगामातील पिकांसाठी चांगली समजली जाते. मध्यम ते काळया स्वरुपाची माती मराठवाडा प्रदेशाच्या सुमारे 64.75 टक्के प्रदेशावर पसरलेली आहे.सध्याच्या स्थितीत मृदेचे आरोग्य तपासण्यासाठी आम्ही मराठवाड्यातील 7 जिल्ह्यांमधील विविध भागांमधून जवळपास 1000 पेक्षा जास्त मातीच्या नमुन्यांचे अहवाल गोळा केले आहेत. त्या सर्व अहवालांची तुलना आणि विश्लेषणासाठी जवळपास 98 नमुना अहवाल निवडले आहेत, ज्यात मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यातून 14 अहवाल निवडले आहेत. तुलनात्मक अभ्यासासाठी आम्ही नत्र, स्फुरद, सेंद्रिय कर्ब, सामू असे सुमारे 4 मृदा निर्देशक निवडले आहेत. सर्व अहवाल तपासणी व सूक्ष्म परीक्षण करत असताना आम्हाला मृदेच्या सध्याच्या आरोग्याविषयी अनेक असमाधानकारक आणि चिंताजनक निष्कर्ष आढळून आले. हे निष्कर्ष भविष्यातील शेतीपद्धती, पिकांचे उत्पादन आणि प्रदेशातील एकुण कृषी आरोग्यासाठी एक गंभीर धोक्याचा इशारा ठरतील यात शंका नाही.

माती नमुना अहवाल तपासणी करताना जी मापदंड निवडले होते त्यांची तुलना पीक वाढीस असणाऱ्या योग्य प्रमाणास केली असता काही निष्कर्ष समोर आले ते म्हणजे सर्वप्रथम आपण ज्याला मातीचा आत्मा व मातीच्या सुपीकतेचा कणा असे म्हणतो तो सेंद्रिय कर्ब किमान 0.75 % ते 1 % पेक्षा जास्त असायला हवा तो माती नमुन्यातील जवळपास 100% अहवालात खूप कमी म्हणजे नगण्य असा आढळून आला, 33.33% अहवालात 0.75% पेक्षा कमी आढळून आला, तसेच 66.67 % अहवालात 0.50% पेक्षा कमी आढळून आला.पीक वाढीच्या प्रमुख अन्नद्रव्या पैकी एक नत्र ज्याला आपण पीक वाढीचे इंधन असे म्हणतो, त्याचे प्रमाण 85.71% अहवालात अत्यंत कमी, 14.29% अहवालात पुरेश्या प्रमाणात आढळून आले.ऊर्जा निर्मिती प्रक्रियेत महत्वाची भूमिकी बजावत असलेले आणि ज्याला आपण पिकांच्या मुळांची ताकद असे म्हणतो ते प्रमुख अन्नद्रव्यापैकी एक स्फुरद याचे प्रमाण 88.10% अहवालात अत्यंत कमी, 11.90% अहवालात मध्यम ते पुरेश्या प्रमाणात आढळून आले.सामू म्हणजे हायड्रोजन ची शक्ती, मातीचा किंवा द्रावणाचा सामू म्हणजे आम्लतेचे किंवा क्षारतेचे मोजमाप. हे मोजमाप 6.5 ते 7.5 दरम्यान मूलभूत असायला पाहिजे म्हणजे पिकाला जमिनीतील अन्नद्रव्य सहज उपलब्ध होतील परंतु जवळपास 75% नमुन्यातील अहवालात हा सामू वाढलेला म्हणजे अल्कधर्मी दिसून आला.सेंद्रिय कर्ब 0.50% पेक्षा कमी असणे, नत्र आणि स्फुरद 85% पेक्षा जास्त नमुन्यांत अत्यंत कमी असणे आणि pH 7.8–8.5 पर्यंत वाढणे ही मातीची सुपीकता, पोषक तत्त्वांची उपलब्धता आणि पिकांच्या उत्पादनक्षमतेवर गंभीर परिणाम करणारी लक्षणे आहेत. अभ्यासातून स्पष्ट होते की मराठवाड्यातील मृदा सध्या अत्यंत असंतुलित, कमी सुपीक आणि पोषक तत्त्वांनी दारिद्र्यग्रस्त स्थितीत आहे. जमिनीचा कणा मानला जाणारा सेंद्रिय कर्ब जवळपास संपूर्ण प्रदेशात अत्यल्प आहे. पीक वाढीसाठी अत्यावश्यक नत्र व स्फुरदाचे प्रमाण गंभीर पातळीवर कमी झाल्याने भविष्यातील उत्पादनक्षमतेवर थेट परिणाम होण्याची शक्यता प्रबळ आहे. याशिवाय अल्कधर्मी pH मुळे लोह, जस्त, मँगेनीज व स्फुरद सारख्या पोषक तत्त्वांचे शोषण कमी होते.मराठवाडा हा कोरडवाहू आणि हवामानातील अनियमिततेने प्रभावित प्रदेश असून, सध्याच्या काळात येथे मृदेचे आरोग्य झपाट्याने खालावत आहे. ही परिस्थिती पुढील काही वर्षांत उत्पादनात घट, खर्चात वाढ, पिकांची गुणवत्ता कमी, पिकांची प्रतिकारशक्ती कमी यांसारख्या गंभीर परिणामांना कारणीभूत ठरु शकते. त्यामुळे मृदेचे आरोग्य हा तातडीने लक्ष द्यावा लागणारा विषय बनला आहे.जर तातडीने माती आरोग्य व्यवस्थापन, जलसंधारण आणि शाश्वत शेती पद्धती अवलंबल्या नाहीत, तर मराठवाड्यातील शेती पुढील काही वर्षांत अधिक मोठ्या संकटात सापडू शकते. मृदा संरक्षण हा आजच्या काळाची नितांत आवश्यकता असून, माती वाचली तरच शेती वाचेल, आणि शेती वाचली तरच मराठवाड्याचा भविष्यकाळ सुरक्षित राहील. **प्रा. अक्षय काकडे- 8805414171 , प्रा. प्रविण मांजरे – 8888348050 (सदरील लेखाचे लेखक ग्लोबल विकास ट्रस्ट, कृषिकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्र सिरसाळा, ता. परळी जि . बीड येथे वरिष्ठ कृषि सल्लागार म्हणून कार्यरत आहेत.)**

# भाजपाचे निष्ठावंत युवा भाजपा धारूर तालुकाअध्यक्ष

## गणेश बडे यांना भोगलवाडी पंचायत समिती गणातुन मिळणार का संधी - संधी देण्याची भाजपा कार्यकर्त्यांची मागणी



धारूर ( बाबुराव तिडके ) धारूर तालुक्यातील अनेक भाजपा कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी मध्ये प्रवेश केला कोणत्याही निवडणुका आल्या की अनेकांनी मॅनेज होऊन स्वःताची आर्थिक बाजु भक्कम केली पण धारूर तालुका भाजपा युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष मा श्री गणेश बडे यांनी पद असो किंवा नसो लोकनेते मुंडे साहेबांच्या घराण्यातील राजकिय सावली सोडली नाही आणि विशेष श्री गणेश बडे यांच्या सारखा कट्टर भाजपवाशी धारूर तालुक्यात सापडणारच नाही मंत्री ताईसाहेब यांचा आदेश हाच आपल्या करिता सर्वस्वी राजकिय जबाबदारी या उद्देशाने श्री गणेश बडे यांनी काम केलेले आहे आणि करत आहेत धारूर तालुक्यातील भाजपच्या कार्यकर्त्यांची मंत्री ताईसाहेब यांच्याकडे मागणी होताना दिसत आहे की आत्ता पर्यंत गणेश बडे यांनी कोणत्याही उमेदवारीची मागणी पक्षाकडे केलेली नाही पण आता मागणी होत असल्याने जनमत लक्षात घेऊन श्री गणेश बडे यांना भोगलवाडी पंचायत समिती गणातुन निवडणुक लढण्या -करिता राज्याच्या मंत्री ताईसाहेब यांनी मा श्री गणेश बडे यांना राजकिय पाठबळ देऊन भोगलवाडी पंचायत समितीचे तिकिट द्यावे अशी मागणी कार्यककर्ते करताना दिसत आहेत

**हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com**

# भ्रष्टाचार: एक मोठीच सामाजिक समस्या

## (9 डिसेंबर: आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन.)

_आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन- इंटरनॅशनल एंटी-करप्शन डे दरवर्षी 9 डिसेंबर रोजी साजरा केला जातो, ज्याचा उद्देश भ्रष्टाचाराविरुद्ध जागरूकता निर्माण करणे, संयुक्त राष्ट्रांच्या भ्रष्टाचार विरोधी कराराबद्दल माहिती देणे आणि या जागतिक समस्येचा सामना करण्यासाठी लोकांना एकत्र आणणे हा आहे, कारण भ्रष्टाचारामुळे देशांच्या सामाजिक, आर्थिक आणि लोकशाही विकासात अडथळे निर्माण होतात. श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा ज्ञानवर्धक व महत्वपूर्ण लेख जरूर वाचा.... संपादक._

भ्रष्टाचार म्हणजे वैयक्तिक फायद्यासाठी सोपवलेल्या सत्तेचा गैरवापर करणे, ज्यात लाच घेणे, फसवणूक करणे, अपहार करणे किंवा पक्षपात करणे यांसारख्या गैरकृत्यांचा समावेश होतो, ज्यामुळे लोकशाहीवरचा विश्वास कमी होतो, आर्थिक नुकसान होते आणि लोकांच्या मूलभूत सेवांवर परिणाम होतो; यासाठी अनेक कायदे आणि संस्था आहेत, पण तो थांबवण्यासाठी जनजागृती व कठोर अंमलबजावणी आवश्यक आहे.

भ्रष्टाचार म्हणजे काय? सोप्या भाषेत, जेव्हा एखादी व्यक्ती आपल्या पदाचा किंवा अधिकाराचा वापर स्वतःच्या किंवा इतरांच्या फायद्यासाठी करते, तेव्हा त्याला भ्रष्टाचार म्हणतात. यात पैशाची मागणी करणे, सरकारी कामात अडथळे आणणे, नियम मोडणे, किंवा खोटी कागदपत्रे तयार करणे यांसारख्या गोष्टींचा समावेश होतो.

भ्रष्टाचाराचे प्रकार : लाचखोरी- पैसे किंवा इतर वस्तू देऊन काम करून घेणे, अपहार- सार्वजनिक निधीची चोरी करणे, घराणेशाही- आपल्या नातेवाईकांना किंवा मित्रांना फायदा मिळवून देणे, खंडणी- धमकावून पैसे घेणे, हितसंबंधांचा संघर्ष- आपले वैयक्तिक हितसंबंध सार्वजनिक हितापेक्षा महत्त्वाचे मानणे.

भ्रष्टाचाराची कारणे: लोभ-पैशाची किंवा संपत्तीची हाव, अज्ञान- भ्रष्टाचारविरोधी कायद्यांची माहिती नसणे, जबाबदारीचा अभाव- पदाचा गैरवापर करण्याची वृत्ती, कठोर कायद्यांची अंमलबजावणी नसणे- कायद्याची भीती नसणे.

भ्रष्टाचाराचे परिणाम: आर्थिक नुकसान- सार्वजनिक निधी वाया जातो, प्रकल्पांचा दर्जा घसरतो, सामाजिक असंतोष- लोकांचा सरकारवरील विश्वास उडतो, विकास थांबतो- शिक्षण, आरोग्य यांसारख्या क्षेत्रांवर परिणाम होतो, गरिबांचे शोषण- गरीब लोकांना न्याय मिळत नाही.

भ्रष्टाचार रोखण्यासाठी उपाय:

कायदे आणि संस्था- भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, माहिती अधिकार कायदा यांसारखे कायदे, पारदर्शकता- सरकारी कामांमध्ये पारदर्शकता आणणे, जनजागृती- नागरिकांनी जागरूक राहणे आणि तक्रार करणे, तंत्रज्ञानाचा वापर- ऑनलाइन तक्रारी आणि सेवा.

आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन दरवर्षी 9 डिसेंबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस प्रत्येक व्यक्तीसाठी सक्रियपणे बोलण्यासाठी आणि इतरांच्या जीवनातील भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्यासाठी एक स्मरणपत्र आहे. भ्रष्टाचारविरोधी भूमिका घेण्याच्या गरजेकडे लक्ष देण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस घोषित केला आहे.

आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन भ्रष्टाचारविरोधी आणि शांतता, सुरक्षा आणि विकास यांच्यातील महत्त्वाचा दुवा हायलाइट करण्याचा प्रयत्न करतो. गुन्ह्यांचा मुकाबला करणे हा प्रत्येकाचा हक्क आणि जबाबदारी आहे, हा विश्वास त्याच्या मुळाशी आहे कारण प्रत्येक व्यक्ती आणि संस्थेच्या सहभागाने आणि सहकार्यानेच आपण गुन्हेगारीच्या नकारात्मक परिणामांवर मात करू शकतो.

आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिवसानिमित्त भ्रष्टाचाराविरुद्ध जगाला एकत्र आणण्यासाठी राज्ये, सरकारी अधिकारी, नागरी सेवक, कायद्याची अंमलबजावणी करणारे अधिकारी, माध्यमांचे प्रतिनिधी, खाजगी क्षेत्र, नागरी समाज, शैक्षणिक संस्था, जनता आणि तरुण यांची भूमिका आहे. जगाला आज अनेक पिढ्यांमधील काही सर्वात मोठ्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. अशी आव्हाने जी जगभरातील लोकांसाठी समृद्धी आणि स्थिरता धोक्यात आणतात. भ्रष्टाचाराची पीडा त्यातल्या बहुतेकांमध्ये गुंफलेली आहे.

भ्रष्टाचाराचा समाजाच्या प्रत्येक पैलूवर नकारात्मक प्रभाव पडतो आणि त्याचा संघर्ष आणि अस्थिरतेशी खोलवर संबंध आहे, सामाजिक आणि आर्थिक विकासाला धोका निर्माण होतो आणि लोकशाही संस्था आणि कायद्याचे राज्य कमी होत आहे. भ्रष्टाचार हा केवळ संघर्षालाच कारणीभूत ठरत नाही तर त्याचे मूळ कारण आहे. हे कायद्याचे राज्य कमी करून, गरिबी वाढवून, संसाधनांमध्ये बेकायदेशीर प्रवेश सुलभ करून आणि सशस्त्र संघर्षासाठी वित्तपुरवठा करून संघर्षाला उत्तेजन देते आणि शांतता प्रक्रियेस अडथळा आणते.

शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांची पूर्तता करायची असल्यास भ्रष्टाचार रोखणे, पारदर्शकतेला चालना देणे आणि संस्थांचे बळकटीकरण करणे अत्यावश्यक आहे. भ्रष्टाचार संबंधी महत्त्वाच्या गोष्टी- भ्रष्टाचाराला खाजगी फायद्यासाठी नियुक्त केलेल्या शक्तीचा दुरुपयोग म्हणून परिभाषित केले जाऊ शकते. भ्रष्टाचार ही एक जटिल सामाजिक, राजकीय आणि आर्थिक घटना आहे जी सर्व देशांना प्रभावित करते. भ्रष्टाचार लोकशाही संस्थांना कमजोर करतो, आर्थिक वाढ मंदावतो आणि सरकारी अस्थिरतेला हातभार लावतो. भ्रष्टाचार लोकशाही संस्थांच्या पायावर हल्ला करून निवडणूक प्रक्रिया मोडीत काढतो, कायद्याचे नियम विकृत करते आणि नोकरशाही दलदल निर्माण करते, ज्याचे एकमेव कारण म्हणजे लाच मागणे. आर्थिक वाढ खुंटली जाते कारण थेट परकीय गुंतवणुकीला परावृत्त केले जाते आणि देशातील लहान व्यवसायांना भ्रष्टाचारामुळे आवश्यक "स्टार्ट-अप खर्च" वर मात करणे अनेकदा अशक्य वाटते.

दि.31 ऑक्टोबर 2003 रोजी, जनरल असेंब्लीने भ्रष्टाचाराविरुद्ध संयुक्त राष्ट्र संघाचा करार स्वीकारला आणि सरचिटणीसांनी संयुक्त राष्ट्रांच्या औषध आणि गुन्हेगारी कार्यालयाला राज्य पक्षांच्या परिषदेसाठी सचिवालय म्हणून नियुक्त करण्याची विनंती केली (रिझोल्यूशन 58/4). तेव्हापासून 188 पक्षांनी अधिवेशनाच्या भ्रष्टाचारविरोधी दायित्वांसाठी वचनबद्ध केले आहे, जे सुशासन, उत्तरदायित्व आणि राजकीय बांधिलकीचे महत्त्व जवळपास सार्वत्रिक मान्यता प्रतिबिंबित करते.

भ्रष्टाचाराविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि त्याच्याशी लढा आणि प्रतिबंध करण्यासाठी अधिवेशनाच्या भूमिकेसाठी विधानसभेने 9 डिसेंबर हा आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन म्हणून नियुक्त केला. डिसेंबर 2005 मध्ये अधिवेशन अंमलात आले.

भ्रष्टाचाराविरुद्ध भारताने उचललेली पावले: केंद्रीय दक्षता आयोग, जरी 1964मध्ये तयार झाला असला तरी, संसदेच्या कायद्याद्वारे 2003मध्येच एक स्वतंत्र वैधानिक संस्था बनली. दक्षता प्रशासनावर देखरेख करणे आणि भ्रष्टाचाराशी संबंधित प्रकरणांमध्ये कार्यकारी अधिकारी यांना सल्ला देणे आणि मदत करणे हे त्याचे कार्य आहे.

संबंधित कायदे: माहितीचा अधिकार कायदा 2005, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, न्यायाधीश (तपास) कायदा, लोकपाल आणि लोकायुक्त कायदा 2013, व्हिसलब्लोअर संरक्षण कायदा 2011, मनी लाँडरिंग प्रतिबंध कायदा, बेनामी व्यवहार (प्रतिबंध) कायदा इ. 2011मध्ये भ्रष्टाचाराविरुद्धच्या संयुक्त राष्ट्रांच्या कराराला मान्यता.

निष्कर्ष: भ्रष्टाचार ही एक मोठी सामाजिक समस्या आहे, जी देशाच्या प्रगतीला खीळ घालते. यावर मात करण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी, लोकांचा सहभाग आणि प्रामाणिक नेतृत्वाची गरज आहे. (समाजमाध्यमांवरून साभार जी. )

!! आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोध दिनाच्या सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी,**
**मु. एकता चौक, रामनगर वॉर्ड नं.04, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- 9423714883.**

# सर्वार्थ समाधानी

भारत दौऱ्यात रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या कोडकौतुकात आपण कोणतीही कसूर ठेवली नाही, हे उत्तम झाले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे माथेफिरु प्रेमवीराप्रमाणे वागत असताना त्यांना आपल्याकडून 'तू नही और सही' असा संदेश दिला जाणे गरजेचे होते. तो पुतिन यांच्या भारत दौऱ्यात भरभरून देता आला. त्याची गरज ट्रम्प यांनीच निर्माण केली. ट्रम्प यांच्या हास्यास्पद धोरण- असातत्याने अमेरिका महान होईल, न होईल. पण त्यांच्या अशा वागण्याने अमेरिकेविरोधातील देशांचे संबंध अधिक दृढ होऊ लागतील; हे निश्चित. पुतिन यांच्या या दौऱ्यात त्याची प्रचीती आली. वास्तविक ट्रम्प यांच्या पहिल्या अध्यक्षपदाच्या काळात भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध गोड मधुचंद्री होते. तेव्हा त्यामुळे पहिल्यांदाच आपण रशियापासून दूर जात असल्याचे चित्र निर्माण झाले. ते काही प्रमाणात योग्यही होते. कारण पुतिन यांचा रशिया हा सोविएत रशिया नाही. लष्करी उत्पादनांचा दर्जा खालावता आहे आणि काही वेगळी औद्योगिक प्रगती या रशियास करता आलेली नाही. त्यात तसेही जग एककेंद्री होत होते. हे एकमेव केंद्र म्हणजे अमेरिका. पण स्वत:च्या देशाचे मोठेपण ट्रम्प यांच्यासारख्या खुजा व्यक्तीस खुपू लागले आणि त्यांनी जगातील अनेकांस अमेरिकेविरोधात उभे राहण्याची संधी दिली. ती आपण साधली. कारण आपणासाठीही पर्याय नव्हता. चीनने टोकले, अमेरिकेने टाकले अशा वेळी रशियास टिकवणे शहाणपणाचे होते. तो शहाणपणा आपण दाखवला. म्हणून या भेटीचे स्वागत.युक्रेनवर युद्ध लादल्यानंतर पुतिन यांचा हा पहिला भारत दौरा. या युद्धास काही महिन्यांत चार वर्षे होतील. ते युद्ध थांबावे म्हणून अमेरिकेसह सर्वांचे प्रयत्न सुरू आहेत. पण पुतिन काही त्यांच्या हाती लागू देत नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर आर्थिक निर्बंध लादले गेले. त्याचा फायदा आपल्याला स्वस्त तेलाच्या रुपाने झाला. पण अमेरिकेने आपल्यावर 50 टक्के निर्बंधांची गदा चालवल्यानंतर त्यावर आपणास पाणी सोडावे लागेल, हे स्पष्ट झाले. त्यामुळे आपल्या कंपन्यांस रशियन तेल खरेदीचे प्रमाण कमी करत आणावे लागले. यातून एक तिढा निर्माण झाला. अमेरिका ही या तिढ्यातील समान बाजू. एका बाजूने आपले अमेरिकेशी करार कुंथणे सुरु असताना रशियाचीही अडचण वाढत गेली. या तिढ्यास एक चौथा; पण अदृश्य कोन आहे. तो आहे चीन. अमेरिकेने डोळे वटारल्यामुळे आणि युरोप हा युक्रेनच्या मागे उभा राहिल्यामुळे पुतिन यांनी वेगळे संधान बांधले. ते म्हणजे चीन. त्या देशाचे अध्यक्ष क्षी जिनपिंग आणि पुतिन यांच्यात गेल्या काही महिन्यातील सौहार्दाचे संबंध दिसतात ते यामुळे. म्हणजे एकाच वेळी भारत, रशिया आणि चीन या तीनही देशांचा एकच समान दु:खबिंदू तयार झाला. अमेरिका. अशा वेळी हे अमेरिकादु:ख कमी करण्यासाठी पुतिन हे चीन आणि क्षी जिनपिंग यांच्या अधिक जवळ जात राहिले तर आपल्यासाठी ती दुहेरी डोकेदुखी ठरली असती. म्हणजे आपण इतके काही करूनही ट्रम्प आपणास भीक घालण्यास तयार नाहीत, क्षी जिनपिंग आणि चीन यांच्यावर विश्वास टाकण्यात अर्थ नाही आणि असे असताना पुतिनही आपल्यापासून दूर गेले तर सगळेच आंतरराष्ट्रीय मुसळ केरात म्हणायचे. ते टाळणे आणि रशिया-चीन संबंध अधिक सुमधुर होण्यापासून थांबवणे ही आपली गरज होती. पुतिन यांच्या भारत दौऱ्यासही पार्श्वभूमी आहे.

## पान 1 वरुन

नागरी संघटनेच्या माध्यमातून भवानी पेठेतून नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर वंचितांसाठी काम करून बाबांनी झोपडपट्टीवासीयांचे विविध प्रश्न मार्गी लावले. खेड लोकसभेची निवडणूक लढविल्यानंतर मात्र सक्रिय राजकारणापासून दूर होऊन त्यांनी सामाजिक क्षेत्रात काम करण्यात जीवन व्यतीत केले.

--------------------------------------

घटनेनंतर शांत झाला. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी या घटनेबाबत तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.आपल्या महाराष्ट्रात प्रागतिक ,कृतीशील विचार मांडून ते आचरणात आणणाऱ्या शिलेदारांची एक मोठी फळी आहे. भूमिका घेताना परिणामांची, प्रस्थापित व्यवस्थेच्या रोषाची तमा न बाळगणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये ज्येष्ठ समाजसेवक, पुरोगामी विचारांचे खंदे समर्थक डॉ. बाबा आढाव ह्यांचं नाव आवर्जून घ्यावं लागेल. आज जेव्हा त्यांच्या निधनाचं वृत्त समजलं तेव्हा त्यांचा संघर्षाचा आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याचा सारा पट डोळ्यासमोरुन गेला. 'एकाकी मजदूर' चळवळ, कामगारांच्या हक्कांसाठीची त्यांची अखंड झुंज, समतेवर आधारित समाजरचनेचा त्यांचा ठाम निर्धार अशा सर्व भूमिकांमधून ते सतत प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देत राहिले. आजच्या सामाजिक दृष्ट्या अस्थिर, विषमतेने, विद्वेषाने ग्रासलेल्या काळात बाबा आढाव ह्यांच्यासारख्या निडर, विचारांशी बांधिलकी ठेवून काम करणाऱ्या विभूतींची उणीव सदैव भासत राहील. बाबा आढाव ह्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो व आढाव कुटुंबियांप्रती सहवेदना व्यक्त करतो.

--------------------------------------

यांनी दिनांक 29 नोव्हेंबर 2025 रोजी मुख्यमंत्र्यांना लेखी पत्र देऊन सौ. संध्या देशमुख व दीपक देशमुख यांना संरक्षण देण्याची मागणी केली होती. परळी पोलीस स्टेशनचे अधिकारी, कर्मचारी दखल घेत नसल्याने, व अद्याप संरक्षण न मिळाल्याने ही भेट घेण्यात आली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सध्या परळी शहरात निवडणूक काळात होत असलेल्या कथित गैरप्रकारांमुळे तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, कोणत्याही क्षणी अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. येत्या 20 डिसेंबर रोजी परळी शहरात पाच नगरसेवक पदासाठी मतदान प्रक्रिया होणार असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे अत्यंत आवश्यक आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) यांच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराचे पती बाजीराव धर्माधिकारी यांची कथित फोन रेकॉर्डिंग व्हायरल झाली आहे. या संभाषणात दीपक देशमुख यांचे नाव येत असल्याने ते 'रडारवर' आल्याचे स्पष्ट होत असून, ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असल्याचे निवेदनात म्हटले आहे.या सर्व बाबी लक्षात घेता, संभाव्य धोका टाळण्यासाठी सौ. संध्या दीपक देशमुख व दीपक रंगनाथ देशमुख यांना तत्काळ पोलीस संरक्षण द्यावे, परळी शहर पोलीस स्टेशन संबंधित प्रकरणात दखल घेत नाही. दोन वेळा या प्रकरणी ते पोलीस स्टेशनला जाऊन आले. तसेच संबंधित कथित फोन रेकॉर्डिंगची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी व पालकमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

--------------------------------------

असे सांगितले. ते म्हणाले मी एक लाख 40 हजारांनी निवडून आलो आहे. माझी जबाबदारी आहे की नाही. बीडच्या संदर्भातील कामं होती त्यासाठी मुख्यंत्र्यांना पत्र दिले आहे. आता आशा करतो की कामं होतील. धनंजय मुंडे यांना मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या आरोपाविषयी पत्रकारांनी विचारले असता ते म्हणाले, या प्रकरणी मी बोलणार नाही. एसआयटीची स्थापन करण्यात आली आहे. मागील एक वर्षापासून मला टार्गेट करण्यात येत आहे. का करण्यात येत आहे याचा विचार पत्रकारांनी देखील करायला हवा.

--------------------------------------

परळी वैजनाथ जि. बीड कारखाना व्यवस्थापनाने गळीत हंगाम 2025-2026 साठी गाळपास येणाऱ्या ऊसाचा दर निश्चित केलेला आहे. यंदाच्या हंगामासाठी कारखान्याकडून प्रति मे. टन रु. 3050/- दर जाहीर करण्यात आलेला आहे. तरी गळीतास येणाऱ्या ऊसाला पहिला हप्ता रुपये 2950/- प्रति मे. टन व दीपावली सणासाठी दुसरा हप्ता रुपये 100/- प्रति मे. टन दर देण्याचा निर्णय कारखाना व्यवस्थापनाने घेतलेला आहे. तसेच ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना हंगाम 2025-26 मध्ये गळीतास आलेल्या ऊसाच्या टनेजनुसार कारखाना धोरणाप्रमाणे दीपावली सणानिमित्त मोफत साखर वाटप करण्यात येईल.कारखान्यास ऊस पुरवठादार, शेतकरी यांचे सहकार्य आणि विश्वास नेहमीच कारखान्यासोबत राहिल. यापुढेही आपला कारखाना आपल्या हितासाठी सर्वोत्तम निर्णय घेण्यास तत्पर राहील. सर्वाधिक ऊस दर देणारा कारखाना ओंकार ठरला आहे. या मुळे शेतकऱ्यांत खुप आनंदाचे वातावरण आहे. चेअरमन बाबुरावजी बोत्रे पाटिल यांचे शेतकऱ्यांतून अभिनंदन केले जात आहे.

--------------------------------------

महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. नंतर मान्यवरांनी श्री.जगनाडे महाराज यांचा जिवनपट मांडला. हे संत तुकाराम महाराजांच्या चौदा टाळकऱ्यातील एक प्रमुख टाळकरी होते. तुकाराम महाराजांनी ज्या रचना रचल्या त्या सर्व जगनाडे महाराजांना मुखोद्गत होत्या. तुकाराम महाराजांच्या रचना व गाथा लिहीण्याचे कार्य संताजी जगनाडे महाराजांनी केले. तेली समाज संताजी महाराजांना आपले आराध्य दैवत मानतो. त्यामुळे त्यांचा संपूर्ण महाराष्ट्रात परिचय झाला. वारकरी संप्रदाय गेल्या अनेक वर्षांपासून जयंती, पुण्यतिथी साजरी करतात. या कार्यक्रमास संघटनेचे सदस्य, समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान 4 वरुन

करण्याचा निर्णय घेतला आहे.

आयोजक लखन हजारे, शरद धिवार आणि अशोक गायकवाड यांनी केज शहर आणि तालुक्यातील सर्व ज्येष्ठ दलित चळवळीतील कार्यकर्त्यांना विनम्र आवाहन केले आहे की, त्यांनी या गौरवपूर्ण सन्मान सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून, तरुणांना मार्गदर्शन करावे व कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

--------------------------------------

बालासाहेब लोखंडे, आश्रुबा गायकवाड, पुंडलिक पोपळघट, शामल जाधव आणि मोहसिन साबेर कुरेशी यांचा समावेश आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान गटशिक्षणाधिकारी सुनिल केंद्रे यांनी भूषवले. तर प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार राकेश गिड्डे उपस्थित होते. यावेळी बोलताना तहसीलदार राकेश गिड्डे यांनी शिक्षकांना 'समाजाचा दिशा-दर्शक दीपस्तंभ' आणि 'नव्या पिढीचे शिल्पकार' म्हणून गौरवले.

हनुमंत भोसले यांनी अशा पुरस्कारांमुळे शासकीय पुरस्कारांपासून वंचित राहणाऱ्या शिक्षकांना ऊर्जा मिळते, असे मत व्यक्त केले. सुनील केंद्रे यांनी मराठा सेवा संघाच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मराठा सेवा संघाचे जयदीप देशमुख, किशोर भालेराव, युवराज हिरवे आणि इतरांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रम डोईफोडे यांनी केले, तर आभार व्हि एम यादव यांनी मानले.

--------------------------------------

सर्वच पक्षाचे कार्यकर्ते आपापल्यापरीने आकडेमोड करून विजयाचे दावे-प्रतिदावे करत आहेत.

दोन आघाड्यांमध्ये थेट लढत

यावेळी अंबाजोगाई नगरपरिषदेसाठी ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा यांच्या नेतृत्वाखालील शहर जनविकास परिवर्तन आघाडी आणि पापा मोदी यांच्या आघाडीमध्ये थेट लढत झाली. सोबतच, काँग्रेस पक्षानेही थोड्याफार प्रमाणात आपली उपस्थिती नोंदवली आहे. यामुळे येणाऱ्या 21 तारखेला गुलाल कोण उधळणार याकडे संपूर्ण अंबाजोगाईकरांचे लक्ष लागले आहे.

नंदकिशोर मुंदडा यांचा प्रथमच प्रत्यक्ष सहभाग

अंबाजोगाई शहराच्या विकासाचे व्हिजन घेऊन नंदकिशोर मुंदडा यांनी या निवडणुकीत प्रथमच प्रत्यक्ष सहभाग घेत नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी केली आहे. त्यांचे भवितव्य मतपेटीमध्ये बंद झाले असून, शहरात सध्या तरी बहुसंख्य अंबाजोगाईकरांनी नंदकिशोर मुंदडा हेच बाजी मारणार असे मत नोंदवलेले आहे.

आमदार नमिता मुंदडा आणि युवा नेते अक्षय मुंदडा यांनी या निवडणुकीत नंदकिशोर मुंदडा यांच्या पाठीशी आपली पूर्ण ताकद भक्कमपणे उभी केली होती. या ताकदीला अंबाजोगाईकरांनी कसा प्रतिसाद दिला आहे, हे 21 डिसेंबर या तारखेला स्पष्ट होणार आहे.

--------------------------------------

नियामक आयोग (MERC) ग्राहक तक्रार निवारण मंचच्या छत्रपती संभाजीनगर (यू) सर्कलचे अध्यक्ष आसून MSEDCLच्या जालना सर्कलचा अतिरिक्त कार्यभारही त्याच्याकडे आहे.

--------------------------------------

मंदिर रोड वरील डॉ. भालचंद्र वाचनालयात हलविण्यात आले. नगरपालिकेच्या इमारतीत काही लोकांनी गोंधळ घालुन नगरपालिका कर्मचार्यांशी हुज्जत घातल्याने कार्यालय दैनंदिन कामासाठी बंद ठेवावे लागले होते. या तणावपूर्ण परिस्थितीत नागरीकांची कामे खोळंबु नयेत यासाठी सध्या रिकाम्या असलेल्या डॉ. भालचंद्र वाचनालयाच्या इमारतीत सोमवार दि. 08 डिसेंबर पासून नगर परिषद कार्यालय सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे आता कार्यालयीन कामे सुरळीत होणार आहेत. नगर परिषद कार्यालय हे दि.21 डिसेंबर पर्यंत हलविणार आहोत. त्र्यंबक कांबळे, मुख्याधिकारी, न.प. परळी यांनी सांगितले.

--------------------------------------

आपल्याला मिळाला आहे. संत तुकारामांचे नवीन नवीन अभंग ते आपल्या वहीत लिहून ठेवत.जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या विचारांना जिवंत ठेवण्याचे महान कार्य संत संताजी जगनाडे महाराज यांनी केले.संताजी महाराजांनी तेलसिंधू, शंकरदीपिका, योगाची वाट, निर्गुणाच लावण्य हे ग्रंथ लिहिले. त्यांनी तेलसिंधू या ग्रंथातून तेलाची माहिती दिलेली आहे.तसेच त्यांनी आपल्या अभंगातून मानवतेची शिकवण दिली."

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. जाधव सर सर तर आभार श्री. डोळे सर यांनी मानले शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

--------------------------------------

कुलकर्णी, रवींद्र पंडित, धनंजय नारळे, संतोष कुलकर्णी, जितेंद्र तरटे, प्रवीण खणाळे, रेणुका दास कुलकर्णी आदि मान्यवर उपस्थित होते.

या अधिवेशनास उद्योजक, विविध क्षेत्रातील मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.

तरी समाजातील सर्व ब्राह्मण समाजाने राज्यस्तरीय अधिवेशनास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून अधिवेशन यशस्वी करावे असे आवाहन स्वागत अध्यक्ष सचिन वाडे पाटील यांनी केले आहे.

तरी ब्राह्मण अधिवेशनास बीड जिल्ह्यातील सर्व ब्राह्मण समाजाने जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अखिल भारतीय पेशवा संघटना बीड यांच्यावतीने अखिल भारतीय पेशवा संघटना गेवराई तालुकाप्रमुख अनिल बोर्डे यांनी केले आहे.

--------------------------------------

मीरा शिंदे,ग्रामीण विकास मंडळ झोनल सुपर वायझर वाल्मीक पाईक, लिंक वर्कर लता आगाव, टी, आय च्या प्रियांका पोटभरे यांनी परिश्रम घेतले

--------------------------------------

उपासनेतून मनाला परम शांती प्राप्त होते. माणसाने आपल्या जीवनात नियमबद्धता आणली पाहिजे, स्वतःवर संयम ठेवत सातत्याने चांगले कर्म करावे, हाच खरा ईश्वरपूजनाचा मार्ग आहे. आपणच आपले भवितव्य घडवत असतो, हे लक्षात घेऊन जीवनात सकारात्मकतेने वाटचाल करावी, असे मौलिक विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

या पवित्र तीर्थक्षेत्री औदुंबर वृक्ष, गोमातेचे व धुनीचे दर्शन भाविकांना लाभते. येथे आल्यानंतर सकारात्मक ऊर्जा, चैतन्य आणि मानसिक शांती लाभते, अशी भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली. संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

या प्रसंगी प्रभू राम आंधळे (मरळवाडी) यांच्या सौजन्याने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच देहू आघाव यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमास उद्योजक मधुकर आघाव, संजयजी आघाव, श्रीहरी गुट्टे, प्रभाकर दहिफळे, शिवसेना महाराष्ट्र समन्वयक फुलचंदराव कराड, संदीपान आंधळे, माजी सरपंच विठ्ठल गुट्टे, भाष्कर गुट्टे यांच्यासह अनेक मान्यवर व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

--------------------------------------

म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेच्या निर्मितीच्यावेळी देशातील सर्व जाती, धर्म लिंगाच्या व्यक्तीला समान संधी, समान काम ,समान हक्क, अधिकार दिले आहेत. त्यामुळे देशात समतामूलक समाजाची निर्मिती झाली आहे, असे प्रतिपादन केले तर प्रमुख पाहुणे डॉ. विकास गरड यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे उद्योग निर्मिती आणि प्रोत्साहन देण्यासाठी कायदे व विचार यावेळी मांडले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ.अर्जुन मोरे यांनी केले तर सूत्रसंचालन रासेयो चे कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ मकरंद जोगदंड व आभार समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. मनीषा देशमुख यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

--------------------------------------

,दिनकर रिंगणे , सतीशराव रींगने,अनिल राधे ,योगेश कानडे, यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला

या कार्यक्रमाच्या वेळी माननीय ओमप्रकाश जी शेटे साहेब यांनी आपल्या अध्यक्ष भाषणामध्ये युवा शेतकरी संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे शेतकऱ्याच्या पिकाला योग्य भाव उपलब्ध करून दिल्याचे सांगत कौतुक करून मनःपूर्वक आभार व्यक्त केले व मी आपल्या संघर्ष समितीच्या पाठीशी असून भविष्य काळामध्ये होणाऱ्या आंदोलनात मी आपणास सर्व परी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले तसेच नितीन दादा नाईकनवरे यांनी युवा शेतकरी संघर्ष समिती कार्यकर्त्यांस कोणत्याही क्षणी फोन लावा मी पाठीमागे उभा राहीन माला आदर आहे आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष सन्माननीय नानासाहेब जी घोडके व युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव यांच्या संकल्पनेतून आयोजित केलेल्या सत्कार समारंभाला मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते यावेळी सुभाष कांबळे गुड्डू खंडागळे संतोष जाधव राधाकिसन भाळशंकर,ॲड दत्ता जाधव ,प्रसाद वाघमोडे संतोष खंडागळे, प्रकाश आगवणे, विकास गायकवाड, आकाश कांबळे, प्रकाश कांबळे ,बालासाहेब गवळी , सचिन वाघमारे, बंडू सोनवळे ,नितीन कांबळे ,सुरेश काजळे ,रामभाऊ उदमले, शिवाजी पवार ,भगवान कांबळे, बाळू पोहेकर, मयूर वाघमारे ,कालिदास सोनवणे सह बहुसंख्येने चर्मकार बांधव उपस्थित होते

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री जगताप सर व आभार प्रदर्शन यांनी केले

--------------------------------------

पुर्नलेखन केल्याचे सांगितले तर यावेळी अध्यक्षीय समारोप करताना प्रा प्रसाद देशमुख यांनी संताजी महाराजांबद्दल मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन व आभार प्रा फुटके तर आभार प्रा डॉ गुट्टे यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

--------------------------------------

यावेळी बोलताना सांगितले की,

"संत श्री संताजी जगनाडे महाराज हे समाजातील प्रत्येक घटकाला उभारी देणारे, समानतेचा संदेश देणारे आणि कर्मयोगावर विश्वास ठेवणारे महान संत होते. त्यांच्या कीर्तनातून व मार्गदर्शनातून समाजाला ज्ञान, नैतिकता आणि सेवाभावाचा महत्त्वपूर्ण संदेश मिळाला. विद्यार्थ्यांनी संताजी महाराजांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन कर्तव्यनिष्ठ, प्रामाणिक आणि समाजाभिमुख नागरिक बनावे," असे आवाहन अतुल दुबे यांनी केले.

यावेळी महाविद्यालयात संताजी महाराजांच्या कार्यावर प्रकाश टाकणारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यांच्या भक्तिमय जीवनाचा व समाजकार्यातील योगदानाचा आढावा विद्यार्थ्यांना देण्यात आला.या वेळी प्रा.यु.एन.फड, प्रा.पी.पी.तिडके मॅडम, प्रा.ए.एन. खाकरे,प्रा.ए.डी.शेख, प्रा.एस.के.अपार मॅडम,एस. बी.अष्टेकर, व्हि.एन.शिंदे, यु.बी.जगताप यांच्या सह विद्यार्थी उपस्थित होते.

--------------------------------------

दृष्टिकोनावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, आजच्या पिढीने संतांच्या शिकवणींमधून सामाजिक बांधिलकीची प्रेरणा घ्यावी.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बबन मोहिते यांनी विद्यार्थ्यांना समतेचे तत्त्व, श्रमाची प्रतिष्ठा आणि समाजसेवेचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी एनएसएसच्या माध्यमातून समाजोन्नतीसाठी विविध उपक्रम राबवण्याचे आवाहन केले.

यावेळी महाविद्यालयातील सर्व विभागातील कर्मचारी तसेच इतर अध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी अभंग, विचार आणि वाचनांद्वारे संतांची शिकवण जिवंत केली.

कार्यक्रमाचे समन्वयन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने केले. शेवटी सर्वांचे आभार एनएसएस स्वयंसेवकांनी मानले.

--------------------------------------

हॅलो बीड
परळी संघर्षनेता
मंगळवार दि. 09 डिसेंबर 2025


# केजमध्ये दलित चळवळीतील 'संघर्षवीरांचा' भव्य सन्मान सोहळा; तरुणाईला प्रेरणा देण्याचा मुख्य उद्देश!

## ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या योगदानाला उजाळा, 'पँथर' बांधवांची 14 डिसेंबर रोजी होणार गौरवपूर्ण आठवण

प्रकाश मुंडे /बीड जिल्हा प्रतिनिधी

दलित चळवळीसाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचलेल्या केज शहर व तालुक्यातील ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यासाठी एका भव्य सोहळ्याचे आणि स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संघर्षशील कार्यकर्त्यांच्या कार्याला उजाळा देऊन, नवीन पिढीतील तरुणांना चळवळ अधिक जोमाने पुढे नेण्याची प्रेरणा मिळावी, हा या कार्यक्रमामागील मुख्य उद्देश आहे.



या सन्मान सोहळ्याचे आयोजन रविवार, दिनांक 14 डिसेंबर 2025 रोजी दुपारी 12 वाजता, जे.के. फंक्शन हॉल, फुलेनगर, केज येथे करण्यात आले आहे.

केज शहर व तालुक्यातील अनेक 'पँथर' (दलित पँथर) आणि दलित चळवळीतील कार्यकर्त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही या चळवळीला पुढे नेण्यासाठी मोठे आणि अमूल्य योगदान दिले आहे. या ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी मोठा संघर्ष करून, स्वतःचे आयुष्य पणाला लावून, सामाजिक समानतेसाठी लढण्याचे काम केले आहे. त्यांच्या याच त्याग आणि संघर्षाला उचित सन्मानित करणे आवश्यक आहे, असे आयोजकांनी नमूद केले आहे.

बदललेल्या स्थळी, वाढलेल्या उत्साहात कार्यक्रम

पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार, अनेक 'पँथर' बांधव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबई येथील चैत्यभूमीवर गेलेले असल्याने, आयोजकांनी हा कार्यक्रम शासकीय विश्रामगृहाऐवजी, जे.के. फंक्शन हॉल, फुलेनगर येथे रविवार, 14 डिसेंबर रोजी आयोजित पान 3 वर

# केज येथे 'क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आदर्श शिक्षक' पुरस्कार प्रदान सोहळा उत्साहात संपन्न!

## 16 उपक्रमशील शिक्षकांचा सन्मान; तहसीलदार आणि गटशिक्षणाधिकारी यांची उपस्थिती



प्रकाश मुंडे/बीड जिल्हा प्रतिनिधी

मराठा सेवा संघ, केज शाखेच्या वतीने आयोजित 'क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार वितरण सोहळा' रविवारी येथील शिक्षणाधिकारी कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला. केज तालुक्यातील 16 उपक्रमशील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांना त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

या पुरस्काराने सन्मानित झालेल्या शिक्षकांमध्ये महादेवी फुलसुरे, मोहन ढाकणे, व्यंकट चव्हाण, संध्याराणी कोल्हे, सुरेखा मोराळे, नवनाथ घुगे, रेखा धेंडे, संगीता नवले, नितीन हावळे, स्वाती वरपे, बाबुराव तांबडे, पान 3 वर

# अंबाजोगाई नगरपरिषद: मतपेट्यांत बंद झाले नगराध्यक्षपदाचे भवितव्य

## 21 डिसेंबरला उधळणार कोण गुलाल? कार्यकर्त्यांच्या चुरशीच्या पैजा !

प्रकाश मुंडे/ बीड जिल्हा प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील राज्याच्या राजकारणात गाजलेल्या अंबाजोगाई नगरपरिषद निवडणुकीची प्रक्रिया नुकतीच पार पडली आहे. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या निवडणुकीनंतर आता शहरवासीयांना आणि उमेदवारांना निकालाची प्रतीक्षा आहे. शहरातील वातावरण सध्या पूर्णपणे निवडणुकीच्या चर्चेने ढवळून निघाले असून, कोण निवडून येणार याबद्दल कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पैजा लागल्या आहेत.

निकालाची उत्सुकता

या निवडणुकीचा निकाल 21 डिसेंबर रोजी लागणार असल्याने शहरातील गल्लीबोळात जोरदार चर्चांना उधाण आले आहे. पान 3 वर



# अंकुश केदार यांची बीड महावितरणच्या ग्राहक मंचाच्या अध्यक्षपदी नियुक्ती



केज | केज तालुक्यातील सारणी (सांगवी) येथील रहिवासी असलेले अंकुश भिमराव केदार यांची महावितरणच्या बीड विभाग ग्राहक मंचाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे.

अंकुश भीमराव केदार हे यांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या सारणी (सां) गावी येथे झाले तर माध्यमिक शिक्षण अंबाजोगाई येथे झाले. त्यांनी कृषी विद्यापीठ पुणे येथून एम एस सी ॲग्री पदवीचे शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी एम पी एस सी उत्तीर्ण होऊन महाराष्ट्रात विविध उच्च पदावर काम केले असून ते गेल्या वर्षांपूर्वी नागपूर येथून उपायुक्त या पदावर निवृत्त झाले आहेत.

अंकुश केदार हे अत्यंत शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळखले जातात तसेच त्यांच्या जनतेशी चांगला संपर्क असून त्यांची बीड विभाग महावितरणच्या ग्राहक म्हणजेच अध्यक्षपदी निवड झाली. या त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

सद्या ते महाराष्ट्र विज पान 3 वर

# नगर परिषद कार्यालय डॉ.भालचंद्र वाचनालयात स्थलांतरित



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- परळी नगर परिषद निवडणुकित मतदान झालेल्या मतदान यंत्रे नगर परिषद कार्यालयात ठेवण्यात आले आहेत. त्याठिकाणी निवडणूक व पोलिस प्रशासनाने गुरुवार 4 डिसेंबर रोजी नगरपालिकेची संपुर्ण इमारत सील केली होती. या पार्श्वभूमीवर नगरपालिकेचे दैनंदिन कामकाज डॉ.भालचंद्र वाचनालयाच्या इमारतीत हलवण्याचा निर्णय नगरपालिका प्रशासनाने घेतला होता. त्यानंतर सोमवार दि. 08 डिसेंबर पासून डॉ.भालचंद्र वाचनालयाच्या इमारतीत नगर परिषद सर्व विभागातील कामकाज सुरु करण्यात आले.

नगर परिषद निवडणूक मतदान 2 डिसेंबर रोजी शांततेत पार पडले. परळी शहरातील 88 बुथवरील मतदान यंत्रे निकालापर्यंत ठेवण्यासाठी नगर पालिका इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर स्ट्रॉंगरुम तयार करण्यात आले आहेत. त्या ठिकाणी मतदान यंत्रे ठेवण्यात आली. मतदान यंत्राच्या सुरक्षेच्या दृष्टीने 21 डिसेंबर पर्यंत या रुमच्या बाहेर सीसीटीव्ही कॅमेरे बसवुन ते पहाण्यासाठी पार्किंगच्या जागेत मॉनिटर बसवुन व्यवस्था करण्यात आली आहे. याच अनुषंगाने प्रशासनाने नगरपालिकेची संपूर्ण इमारत बंद केली होती. यामुळे सामान्य नागरीकांची घरपट्टी, नळपट्टी भरणे, पीटीआर संबंधी असलेली सर्व कामे खोळंबली होती. त्यामुळे नगर परिषद कार्यालय फाऊंडेशन स्कुल जवळ, नाथ चित्र पान 3 वर

# संत श्री संताजी जगनाडे महाराज वारकरी संप्रदायातील एक महान संत म्हणून ओळखले जातात आणि त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी मानले जाते .- दीपक तांदळे

## संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभागात संत श्री संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी



परळी ( प्रतिनिधी ) - शहरातील श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित, संस्कार प्राथमिक शाळा,विद्यानगर विभागात संत श्री संताजी जगनाडे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. कैलास तांदळे (अध्यक्ष, पद्मावती शिक्षण संस्था) प्रमुख पाहुणे श्री. दीपक तांदळे (सचिव, पद्मावती शिक्षण संस्था) तसेच प्र. मुख्याध्यापक श्री. गायकवाड सर यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संत श्री संताजी जगनाडे महाराज व शिक्षणमहर्षी कै.विठ्ठलरावजी तांदळे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

श्री. दीपक तांदळे यांनी संत श्री संताजी जगनाडे महाराज यांच्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, "संत श्री संताजी जगनाडे महाराज यांचा जन्म 8 डिसेंबर 1624 रोजी पुणे जिल्ह्यातल्या मावळ तालुक्यातील सुदुंब्रे या गावी विठोबा जगनाडे यांच्या घरी झाला. विठोबा जगनाडे व आई मथाबाई हे विठ्ठलभक्त होते, त्यामुळे संताजींवर लहानपणापासूनच धार्मिक संस्कार झाले.संताजी महाराजांनी संत तुकाराम महाराजांना गुरुस्थानी मानले होते त्यांच्यामुळेच आपल्याला संत तुकाराम महाराजांच्या अनमोल साहित्याचा साठा पान 3 वर

# राज्य स्तरीय ब्राह्मण महा अधिवेशनास जिल्ह्यातील ब्राह्मण समाजाने हजर राहावे :- अनिल बोर्डे



गेवराई ( प्रतिनिधी ) सर्व ब्राह्मण समाजाचे अधिवेशन 1 फेब्रुवारी 2026 रोजी 9 ते 7 या वेळेत मंथन हॉल, बीड बायपास ,येथे एमआयटी कॉलेज, छत्रपती संभाजीनगर येथे ब्राह्मण अधिवेशन आयोजित केले आहे. अशी माहिती स्वागत अध्यक्ष सचिन वाडे पाटील यांनी दिली आहे.

या बैठकीत विजय काजे, संदेश देशपांडे, संतोष जोशी, विवेक जोशी, काशिनाथ चांदजकर, महेश

# जागतिक एड्स पंधरवडा निमित्त मोहा येथे एड्स जन जागृती व तपासणी शिबिर संपन्न!



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) –आज दिनांक 8 डिसेंबर 2025 रोजी जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष जिल्हा रुग्णालय बीड आणि वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय परळी वैजनाथ यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आयसीटीसी विभाग आणि लिंक वर्कर प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने मोहा या गावात एच आय व्ही एड्स जनजागृती व तपासणी शिबिर घेण्यात आले . यात प्रथम गावकऱ्यांना शरद चव्हाण,अमोल गालफाडे (लॅब टेक्निसियन) यांनी एच आय व्ही एड्स टीव्ही गुप्तरोग या आजारांची सविस्तर माहिती देण्यात आली व स्वतःची एच आय व्ही तपासणी करण्याबाबत आवाहन केले त्यानंतर तपासणी करण्यात आली आजच्या शिबिरात एकूण 38 लोकांनी तपासणी करुन घेतली हे शिबिर यशस्वी करण्यासाठी रुक्मिण पांडुरंग शेप (ग्रा.प.सरपंच) संदीप रामकृष्ण देशमुख (उपसरपंच) रवींद्र पोटभरे (ग्रा.प.सदस्य) (बचत गट सीआरपी)संगीता बालासाहेब रुमोले, सारिका महादेव शिंदे, ज्योती शिंदे (मदतनीस) अशा वर्कर पान 3 वर

# श्री क्षेत्र दत्तधाम येथे दत्त जन्मोत्सव भक्तिभावात व उत्साहात साजरा



परळी | प्रतिनिधी भगवान शंकराचार्य महाराजांनी प्रतिकाशीचा मान दिलेल्या श्री क्षेत्र दत्तधाम येथे दत्त जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावात व आध्यात्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी 8 ते 10 या वेळेत रुद्राभिषेक पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. परिसरात मंत्रोच्चार, भक्तीभाव आणि चैतन्यपूर्ण ऊर्जा अनुभवायला मिळत होती.

यावेळी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करताना स्वामी डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज म्हणाले, भगवान दत्तात्रेय हे समस्त विश्वाचे मार्गदर्शक असून दत्त पान 3 वर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने देशात समतामूलक समाजाची निर्मिती- गोविंदराव देशमुख



महेंद्र गोदाम ग्रामीण प्रतिनिधी घाटनांदुर अंबाजोगाई घाटनांदुर येथील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागामार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोपात कामधेनू सेवाभावी संस्थेचे सचिव व अधिसभा सदस्य गोविंदराव देशमुख बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष कामधेनू सेवाभावी संस्थेची सचिव व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अधिसभा सदस्य गोविंदराव देशमुख होते तर प्रमुख पाहुणे दुबईस्थित उद्योगपती डॉ.विकास गरड होते.यावेळी मंचावर दुर्गेश रामदानी आयटी इंजिनिअर पुणे ,संजय गांधी निराधार समितीचे सदस्य शिवाजीराव गित्ते , अमोल काळे सर व प्रभारी प्राचार्य डॉ.अर्जुन मोरे उपस्थित होते. यापुढे गोविंदराव देशमुख पान 3 वर

# ऊस दरवाढीबद्दल आंदोलन केलेल्या युवा शेतकरी संघर्ष समितीला माजलगाव राष्ट्रीय चर्मकार महासंघाने केले सन्मानित

माजलगाव प्रतिनिधी :

गेल्या महिन्याभरापासून माजलगाव सह बीड जिल्ह्यामध्ये ऊस उत्पादक शेतकरी ऊसाला रास्त भाव मिळवून देण्यासाठी युवा शेतकरी संघटनेच्या वतीने चक्काजामआंदोलन करून उत्पादन खर्चाच्या प्रमाणामध्ये ऊसाला रास्त भाव मिळवून देण्यासाठी कारखाने बंद करून 27 75 भाव जाहीर करून घेतला शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची रास्त किंमत मिळवून देणाऱ्या लढावे शेतकऱ्यांचा माजलगाव राष्ट्रीय चर्मकार महासंघ यांच्या वतीने मा.डॉ ओमप्रकाश शेटे आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र राज्य प्रमुख व मा नितीन दादा नाईकनवरे माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगाव यांच्या हस्ते युवा शेतकरी संघर्ष समितीचे प्रमुख अजय राऊत, ॲड नारायण गोले पाटील, कॉम्रेड मोहनराव जाधव ,नामदेव सोजे पाटील,नारायण तर जगदीश फरताडे, तुकाराम नावडकर, कृष्णा सोळंके ,शुभम माने ,भास्कर खांडे, योगेश कानडे ,दिनकर चाळक ,विजय दराडे ,नितीन कचरे ,सोनाजीराव नाईकनवरे पान 3 वर



# लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात संत संताजी जगनाडे महाराज यांना जयंती निमित्त अभिवादन



परळी वैजनाथ दि.08 (प्रतिनिधी) लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात संत संताजी जगनाडे महाराज यांची 401 वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात संत संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन लक्ष्मीबाई देशमुख शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संजयजी देशमुख, कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख, प्रा डॉ विनोद जगतकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी प्रा.डॉ जगतकर यांनी संताजी जगनाडे महाराज यांनी जगदगुरु तुकाराम महाराज यांचे पुरोगामी विचार पुढे नेत तुकाराम महाराजांच्या गाथेचे पान 3 वर

# संताजी जनगाडे महाराजांनी समाजाला दिलेला आदर्श आजच्या पिढीसाठी दीपस्तंभ — प्राचार्य अतुल दुबे

## यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयात संत श्री संताजी जगनाडे महाराजांची जयंती साजरी.



परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

नाथ शिक्षण संस्था संचलित यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयात आज संत श्री संताजी जगनाडे महाराज यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्राचार्य श्री अतुल दुबे यांच्या हस्ते संताजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्राचार्य श्री अतुल दुबे यांनी पान 3 वर

# नवगण महाविद्यालयात संत जगनाडे महाराज जयंती उत्साहात साजरी



परळी | प्रतिनिधी नवगण महाविद्यालयात संत जगनाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. समाजप्रबोधन, समता आणि सेवा यांचे आदर्श मांडणारे संत जगनाडे महाराज यांच्या जीवनकार्याचा विद्यार्थ्यांना परिचय करून देण्यासाठी महाविद्यालयाने विशेष उपक्रम राबवले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. लालासाहेब घुमरे यांनी उपस्थित राहून संतांच्या कार्यातील मानवतावादी पान 3 वर